# समारोप

## -: समारोप :-

निसर्गाचा मानवी आविष्कार असो की सूचक आविष्कार रसपरिपोषात्मक निसर्ग असो की अलंकार- परिपोषात्मक निसर्ग असो हे सर्व शेवटी त्या नाटककाराचे कौशल्य असते. नाटककारांनी केलेला अभ्यास, त्यांनी संपादन केलेले ज्ञान, त्यांच्या जवळ असलेली सृजनशीलता, वैयक्तिक व सामाजिक जीवन हे सर्व डोकावते ते त्यांच्या कलाकृतीतून. आजवर अनेक साहित्यिकांनी अनेक व्यक्तिरेखा अजरामर केल्या आहेत. तसेच आपल्या नाटयातील विविध रसांच्या छटा दाखवितांना त्यांनी निसर्गाची विविध विलोभनीय रूपे शब्दबद्ध केली आहेत. निसर्गाला शब्दात बांधणे हे काम सोपे नव्हे! ज्या निसर्गापुढे कोणाचेही काहीही चालत नाही असा निसर्ग कधी शकुंतलेसारख्या मानसकन्येसाठी आसवे ढाळतो तर कधी राजाच्या दुःखात सामील झाल्यामुळे ऋतुवसंतही फुलारण्यास नकार देतो. हे सारे घडते ते कवीच्या अलौकिक प्रतिभेमुळेच. अशा प्रतिभावंत कवींची संस्कृताला आणि सा-या भारतीय साहित्याला फार मोठी परंपरा लाभली आहे. त्याच परंपरेतील काही कवींच्या नाटयकृतींना अनुलक्षून विशेषतः त्यातील विविधरंगी निसर्ग अनुलक्षून त्याचे सप्तरंगी इंद्रधनू अर्थात त्यातील विविध छटांचा अर्थ उलगडून सांगतांना जे जाणवले तेच या शोध प्रबंधाचे मूल्यमापन ठरेल.

एकंदरीत संस्कृत नाटकांमध्ये निसर्गाला बरेच प्राधान्य दिलेले दिसते. नाटकातील अधिकाधिक पात्रे निसर्गसानिध्यातच सतत वावरत असलेली दिसतात. कोठे तपोवन असते तर कोठे प्रमदवन असते. कोठे दंडकारण्य असते तर कोठे समुद्रगृह असते. नाटयकथा ही या निसर्गरम्य स्थळांच्या भोवती गुंफलेली असते. कुठे निसर्गकन्या वावरत असते तर कुठे

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

स्वत: नायिकाच लतारूप बनलेली दिसते.

या निसर्गाच्या साहचर्यात नायक आपले अंत:करण उघड करून सांगताना आढळतो तर कोठे निसर्गच नायकाला उपचार करतांना आढळतो. कोठे नायक-नायिकेच्या प्रथम भेटी साठी निसर्ग-प्रेमी भ्रमराचे सहाय्य लाभते तर कोठे नायिका आम्रतरूचे व नवमालिकेचे मीलन घडवून आणते. ही नवमालिका वेगळ्या नावानेही संबोधली जाते. तिचे नांव "वनज्योत्स्ना" नाव ऐकताच मनात चांदणे फुलते. या नावात औचित्यही आहेच. जाईची फुले रात्रीच्या वेळीच पूर्ण उमलतात आणि ती अंधारात चांदण्यासारखी भासतात. वेली अंधारात दिसत नाहीत. दिसतात फक्त या वेलीवरील चांदण्या आकाशातून उतरल्या गत! या चांदण्यांना सुगंधही असतो. अशा या वनज्योत्स्नेचे अनुरूप वराशी योग्य वेळी मीलन झाल्यामुळे शकुंतला निश्चिंत होते. कालिदासाची प्रतिमा आम्रादी वृक्ष, कमल पुष्पे, हरिणशुककोकिळादी पशुपक्षी यांच्या सहवासात रमलेली दिसते. ती निसर्गप्रेमात पडलेली दिसते. स्वढेच नव्हे तर त्यांच्याशी संभाषण करतांना दिसते. आणि त्यांच्या जीवनक्रमाचे ती एक विशिष्ट अंग बनलेली दिसते.

अशा प्रकारे सृष्टीला प्राधान्य असले तरी कालिदासाची प्रतिमा सृष्टीच्या पलिकडे काल्पनिक जगात सहजपणे संचार करताना दिसते. त्याच्या नायकांचा रथ आकाशसंचारी असतो. या नायकांना देवराज इंद्र स्वत: सहाय्यासाठी पाचारण करतो. स्वर्गीय अप्सरा त्यांना अनुकूल होताना दिसतात. इतकेच नव्हे तर उर्वशीसारखी अप्सरा त्याने नाटकाची नायिका बनविली.

कालिदासाच्या कृतींत वसंतऋतूला विशेष मान असतो. विशेष

म्हणजे हा वसंतऋतू नायकाच्या मनोवृत्तीनुसार, चित्तवृत्तीनुसार प्रफुल्लित अथवा खिन्न होतांना दिसतो. अशा प्रकारच्या प्राकृतिक सौंदर्याचे चित्रण म्हणजे कालिदासाची अलौकिक निपुणताच होय. मालविका-ग्निमित्रातील ग्रीष्म ऋतूचे वर्णनही अत्यंत चित्ताकर्षक आणि स्वाभाविक स्वरूपात प्रस्फुरित झालेले आहे.

"पत्रच्छायासु हंसा मुकुलित नयना दीर्घिकापद्मिनीनां ।
सौधान्यत्यर्थतापाद्वलभिपरिचयद्वेषिपारावतानि ।
बिन्दूत्क्षेपान्पिपासु : परिपतति शिखी भ्रान्तिमद्वारियन्त्रे ।
सर्वैरुस्त्रैः समग्रस्त्वमिव नृपगुणैर्दीप्यते सप्तसप्तिः

[माल. २. १२]

हे राजा, राजप्रासादातील वापोंची [विहिरींची] शोभा ग्रीष्मऋतूत पाहण्याजोगी असते. कमलपत्रांच्या शीतल छायेत मनोरम असे राजहंस नेत्र अर्धवट मिटून गुंगलेले असतात. ग्रीष्मऋतूतील आत्यंतिक उष्म्याने कबूतरे महलांची उंच उंच छते सोडून इकडे तिकडे घिरट्या मारत असतात. तहानेने व्याकूळलेला मोर इकडून तिकडे येरझाऱ्या मारून दमला की कारंज्याच्या जवळपास बसायला येतो. सूर्य आपल्या सर्व-शक्तीनिशी असा काही तेजोमान भासतो की जसे आपल्या सर्व प्रशंसनीय राजकीय गुणांनी युक्त असा चक्रवर्ती सम्राट दैदीप्यमान भासतो.

मालविकाग्निमित्राप्रमाणे विक्रमोर्वशीयातही स्त्री सौंदर्य आणि सृष्टिसौंदर्य यांच्यातील रमणीयतेचा जागोजागी साक्षात्कार घडविला आहे.

अस्याः सर्गविधौ ... रूपं पुराणो मुनि :।

या श्लोकात प्रजापतीच्या निर्मिती विषयी शंका निर्माण करून कवीने त्या उर्वशी विषयी तिच्या रमणीयतम सौंदर्यविषयी रसिकांच्या मनात कुतूहल निर्माण केले आहे. तर "तरंगभ्रूभङ्गा क्षुभितविहग श्रेणिरशना ____

धूमसहना सा परिणता : ४. २८

या श्लोकात स्त्री सौंदर्याची तुलना प्राकृतिक पदार्थांशी करून महाकवीने आपल्या काव्यशैलीचे रोचक स्वरूप साकार केले आहे. केवळ मानवीय सौंदर्याचेच वर्णन महाकवी करतो असे नव्हे तर पशुपक्ष्यांच्या सुंदर हालचालींचे हावभावांचे वर्णन तो अत्यंत यशस्वीपणे करतो.

"ग्रीवाभङ्गाभिरामं मुहुरनुपतति स्यंदने बद्धदृष्टि :
पश्चार्धेन प्रविष्ट: शरपतनभयाद्भूयसा पूर्वकायम् ।
शष्पैरर्धावलीढै: श्रमविवृतमुखभ्रंशिभि: कीर्णवर्त्मा
पश्चोदग्रप्लुतत्वाद्वियति बहुतरं स्तोकमुर्व्यां प्रयाति । अ.शा. १.७

राजा दुष्यन्त आपल्या रथाला जोडलेल्या घोड्यांचे वर्णन करतो आहे. हे स्वभावोक्ति अलंकाराचे उत्तम उदाहरण आहे.

व्यंजना हा कालिदासाच्या शैलीचा विशेष गुण होय. शाकुंतलातील त्याची ध्वन्यात्मक शैली म्हणजे अपूर्व साहित्याचा नमुना होय. भविष्यकालीन घटनांचे सूक्ष्म संकेत ध्वनिकाव्याची उदाहरणे होत. ग्रीष्मवर्णनातील "दिवसा: परिणाम रमणीया:" हा भाग नाटकाचा सुखाद अंत सूचित करतो. तसेच "ईषदीषच्चुम्बितानि सुकुमार केसर शिखानि" हा उल्लेख दुष्यन्त आणि शकुंतलेच्या

अल्पस्थायी मीलनाची सूचक होय. "आश्रममृग: अयम् न हन्तव्य:, न हन्तव्य: शाकुंतलेवर होणारा दारूण प्रणयप्रहार या वाक्यातून सूचित होतो.

कालिदासाने निसर्गातील जडपदार्थाचे मानवीकरण काही वेगळयाच ढंगात केले आहे. निसर्गातील वृक्षवेली, पशू पक्षी मानवाच्या संवेदना जाणणारे आहेत. अशा प्रकारचे चित्रण कालिदासाने केले आहे.

अशा प्रकारे कालिदासाच्या नाटयसृष्टीत वसंतवैभव आणि ग्रीष्मतापा सदृश परिताप, स्वर्गीय आणि पार्थिव सौंदर्य यांचा संयोग झालेला दिसतो.

पण भवभूतीचा निसर्ग सांकेतिक मृदुमधुर नसून भव्य रुद्रभीषण, वास्तव असा आहे. वसंतातील कोकिलालाप, कमलकूजिते, लता सहकार मीलन, कमलनाल यात तो रमलेला नाही तर अरण्यातील भीषण दृश्ये, प्रचंड पर्वतराजी, रानकोंबडे, अजगर, घुबडे, भल्लूक यांची वास्तव पण असांकेतिक वर्णने भवभूती करतो. निसर्गाची वास्तव रौद्रता हिंस्त्र श्वापदे, प्रपात यांच्या चित्रणातून साकार केली आहे.

भवभूतीच्या काव्यात सूचकतेपेक्षा आविष्करण अधिक आढळते. काव्यालंकारनाहीत. पण भावनाविष्काराच्या बाबतीत भवभूती श्रेष्ठ ठरु शकेल.

निसर्गरम्य प्रदेशांचे चित्रण करण्यात भवभूतीली जी सफलता मिळाली त्यावरून असे वाटते की तो विदर्भातील राहणारा असल्यामुळे तेथील अरण्यमय प्रदेशांचे आकर्षण भवभूतीला अधिक वाटत होते.

भवभूतीची शैली वर्णनात्मक आहे. म्हणूनच त्याचे वर्णन हे पूर्ण स्वरूपाचेच व विस्तृत प्रमाणावर असते. तेथे कल्पनेचा शिरकाव नाही.

कालिदास एखाद्या मूर्त पदार्थांचीच उपमा दुस-या मूर्त पदार्थाला देतो. त्यामुळे वाचकाच्या मनावर ती उपमा सहजच प्रतिबिंबित होते. उदा. कोवळ्या पालवीसारखा लालसर अधर, वेलीच्या नाजूक ताण्या-प्रमाणे हात, तटावरील माती पडून गढूळ होणारी नदी या सारख्या मूर्त कल्पना चटकन मन मोहून घेतात. पण भवभूती मात्र आपल्या भावात्मक विचाराना आणि अमूर्त तत्वाना मूर्त पदार्थाची उपमा देतो. सीता म्हणजे मूर्तिमंत करूण रसच किंवा कुशाला येताना पाहून हा मूर्तिमंत वीररसच येत आहे जणू अशा प्रकारच्या उपमा कधी कधी वाचकाच्या लक्षात ही येत नाहीत. कालिदास, सौंदर्यसृष्टीत रमतो, अशक्य गोष्ट कल्पनेने शक्य करतो. उदा. सर्व ऋतू बारा महिने असणे तर भवभूती वास्तवादाचा स्वीकार करतो. शृंगाररसपरिपोष करणे ही कल्पनासृष्टी आहे. पण करूणरस परिपोष करणे म्हणजे जीवनातील वास्तवाचे दर्शन घडविणे होय. प्रत्यक्षात जीवन हे सुखदु:खांची सरमिसळ असते. म्हणून भवभूती एकच रस मानतो तो म्हणजे करूण रस.

<u>मर्यादा</u> - सर्व प्रकारची निसर्ग वर्णने जरी नाटकात असली तरी त्याला काही मर्यादा पडतात.

काहींचा वारंवार उल्लेख येतो.

बहुतेक नाटकाचे नायक हे पराक्रमी राजे असल्यामुळे राजगृह, समुद्रगृह, प्रमदवन मणिहर्म्यासारखे मोठमोठे प्रासाद, अंत:पुरातील दासी, नायकाचे बहुपत्नीत्व या गोष्टी वारंवार येतात. त्याप्रमाणेच निसर्ग विलसितांचा वापरही ब-याच वेळा वारंवारितेचा दोष दर्शवितो.

स्वप्नवासवदत्तम् मध्ये - "नीहार प्रतिहत चन्द्रलेखावासवदत्ता" धुक्याने धूसर बनलेल्या चंद्रकोरीशी वासवदत्तेची तुलना केली आहे. ती अनेक वेळा येते. मानससरोवराकडे जाणारे हंस, चंद्र चांदणी यांचे उल्लेख वेगवेगळ्या संदर्भात पण ब-याच वेळा आले आहेत.
सूर्यविकासी कमळे, चंद्रविकासी कमळे, चक्रवाक, कोकीळ, मोर, मेघ, चांदणे इ. उल्लेखही सारखे येतात.
सहाऋतूपैकी वसंत, ग्रीष्म व वर्षा ऋतूची वर्णने संस्कृत नाटकातून आढळतात. पण हेमंत व शिशिराची वर्णने अभावाने आढळतात. शारदीय चांदण्याच्या संदर्भात शारदऋतूचे वर्णन आढळते.

मेघाचे ही वर्णन वारंवार येते.

वातावरण निर्मितीसाठी लताकुंज, माधवी कुंज प्रमदवन समुद्रगृह यांचा वापर बहुतेक नाटकात आहेच. फुलाफुलातील मध लुटणा-या भ्रमरांचा वापर संस्कृत नाटककारानी समयसूचकते साठी करून घेतला आहे. शाकुंतलात जे भ्रमर राजा दुष्यन्त व शकुंतलेच्या प्रथम भेटीचा दुवा बनले आहेत. तर तेच भ्रमर स्वप्नवासवदत्तम् मध्ये उदयन वासवदत्तेची भेट टाळण्यात प्रसंगावधान राखण्यास आले आहेत.

विक्रमोर्वशीयात हंस, गज, मोर, मेघ, भ्रमर हे वारंवार डोकावताना दिसतात. कमल, चक्रवाक, पर्वत, नदी, हरीण, कदंबवृक्ष, लतिकांची वर्णने, अशोकाची वर्णने या गोष्टी वारंवार येतात.

अवलोकनान्ती असे दिसते की जवळ जवळ सर्व कवींनी जे जे उदात्त भव्य दिव्य रमणीय आहे. त्या सर्वांचा समावेश आपल्या लेखनात केला आहे.

निसर्गाचे विधायक रूपच साहित्यात वारंवार गोवले गेले आहे त्याची विधातक रूपे कोठेही वर्णिलेली आढळत नाहीत.

अतिवृष्टी, अनावृष्टी, भूकंप, वादळे त्यामुळे होणारी हानी या गोष्टींना अजिबात थारा नाही. याचाच अर्थ असा की हल्ली निसर्ग जसा वारंवार कोपलेला दिसतो. त्याच्या क्षोभाची निरनिराळी रूपे दिसतात तसा तो पूर्वी क्षोभक नसावा "राजा कालस्य कारणम्" या न्यायाने राजा उदारपणे न्यायाने वागणारा असल्याने, समाज व्यवस्था सुदृढ होती. आश्रम व्यवस्थांच्या निमित्ताने तपोवने झाडावेलींनी शिकारीच्या निमित्ताने जंगले वनराई पशुपक्षी या सर्वांचे संतुलन होते म्हणून निसर्गदेखील शांत व संथ होता. त्याच्यामध्ये नियमितता होती.

निसर्गातील विविध देवताना संतुष्ट करण्याच्या निमित्ताने यज्ञयाग होत असत. त्यामुळे वातावरण प्रदूषण विरहित होत असे मानव निसर्गावर अवलंबून आहे हे सत्य त्यानी स्विकारले होते.

निसर्गाची विधायक रूपेच पुढे येण्याचे आणखी एक कारण संभवते ते म्हणजे नाटय हे लोकांचे अनुरंजन करण्यासाठी निर्माण झाले आणि दुःखद प्रसंगाने त्यांना क्लेश होतील व मनोरंजनाचा हेतू साध्य होणार नाही. शिवाय नांदीत मंगलाची कामना करून नाटकात जर निसर्गाचे भयाणरूप सादर केले गेले तर ते कामनेशी विसंगत ठरेल. म्हणून ही कदाचित जे जे उत्तम उदात्त उन्नत, महन्मधुर ते ते" या नाटककारानी आपल्या नाटयात आणले व निसर्गाचे एक मनोहारी दर्शन आपल्याला घडविले.

ग्रीष्मातील चटके शिशिरातील पानझड यापेक्षा कवीला

मोहवितो तो फुलारलेला वसंत प्रमदवनाच्या निमीत्ताने कवी जणू स्वर्गीय नंदनवनच आपल्या साहित्यात आणतो. आणि रसिकवाचक व प्रेक्षक त्या नंदनवनात विहरु लागतो. शृंगाररस परिपोषक म्हणून, मानवी भावभावनांचे आविष्करण करण्यासाठी पात्रांच्या स्वभाव परिपोषा-साठी अलंकार परिपुष्टीसाठी निसर्ग तत्परतेने पुढे सरसावला आहे. तसा विनोद निर्मिती साठीही तो क्वचित प्रसंगी पुढे आला आहे.

अधन्यस्य मम कोकिलानामक्षिपरिवर्त इव कुक्षिपरिवर्त: संवृत्त:

काय सांगू माझे दुर्भाग्य कोकिळेचे डोळे इकडून तिकडे फिरावेत तसे माझ्या पोटात ढवळते आहे. स्व. वा. ४. ३४

वस्तुत: एकच बुबूळ हे कावळयाला असते. म्हणूनच येथे चुकीचा संदर्भ देऊन विनोद निर्मिती केलेली आढळते.

भावभूतीचा निसर्ग रौद्र गंभीर आहे तर कालिदासाचा निसर्ग सौम्य व मृदूस्वभावाचा आहे. असेच म्हणावे वाटते. भावभूतीच्या काही कल्पना असांकेतिक आहेत. उदा. नेत्राना अमृताची शलाका म्हणणे किंवा कोमजलेल्या जीवपुष्पाला टवटवी आणणारे कर्णाला अमृत व चित्ताला रसायने होत - [लव]

पदकमल, नेत्रकमल, वदन कमळ, हृदय कमळ असे अनेक संदर्भ येतात. किंवा चंद्रकिरण हाती धरून पिळण्याची कल्पना चंद्रकिरणानी घडलेली मऊ कोमल कमलदेठासारखी नाजूक शरीरयष्टी अशा प्रकारच्या कल्पना भावभूतीच्या नाटकात आढळतात.

तर भासाची गोष्ट याहून अगदीच वेगळी

नीहारप्रतिहत चंद्रलेखाइव - वासवदत्ता
शस्त्रापहीनः कामदेवः - उदयन

संध्याकाळचे साधे पण परिणामकारक वर्णन भास करतो. अग्निः प्रदीप्तः भाति - दिवसा अग्नी पेटलेला असतो तरी तो एवढा जाणवत नाही. पण संध्याकाळच्या वेळी त्याचे तेज निखारते. यासारखे वर्णन किंवा

"शितकाल निर्मल अंतरीक्षे -"
"शरत्काल ती .क्ष्णो आतपः"

यासारखी प्रभावी वर्णने भासाचे रचना कौशल्य प्रकट करतात. भासाच्या कलाकृतीतील निसर्ग काही वेगळयाच रूपात आपल्या समोर येतो तरीपण कालिदासासारखा भास निसर्गाच्या प्रेमात पडत नाही. जेथे आवश्यक तेथेच निसर्ग येतो. पावलोपावली निसर्गाच्या खुणा नसल्या तरी भासाने निसर्गाचे महत्व जाणले नाही असे नाही. काही निवडक उदाहरणावरून भासाची निसर्गवर्णनाची हातोटी लक्षात आल्यावाचून राहत नाही.

शूद्रकाने "मृच्छकटिकम्" या आपल्या प्रकरणात सर्वप्रकारचा निसर्ग वर्णिलेला आहे. विशेषतः पावसाळ्यातील निसर्गाची विविध रूपे शूद्रकाने बहारदार पणे वर्णिली आहेत. अंधारून येण्या पासून ते थेट पावसाच्या धारांचे संगीत ही शब्दात बांधले आहे. एकाच वेळी मेघांना पाहून आनंदनर्तन करणारे मयूर आणि मानस सरोवराकडे जाणारे खिन्न-मानस हंस यांचे वर्णन केले आहे.

मेघांच्या विविध रंगी छटा, विविध आकृती मध्येच चमकणारी वीज, मेघांच्या उदरातून चांदीच्या रसासारखी दिसणारी पाण्याची धार, आकाश रुपी कपड्याच्या टोकाचा धागा अशा प्रकारच्या शब्दात केलेले पावसाचे वर्णन, निरनिराळ्या आकाराच्या मेघांमुळे आकाशाला चित्राची शोभा प्राप्त झाली आहे. अशा प्रकारची अनेक मनोहारी वर्णने मृच्छकटिकाच्या पाचव्या अंकात आली आहेत. अशा घनघोर पावसातही वसंतसेना चारुदत्तास भेटण्यासाठी येत आहे. तिच्या प्रेमाची कसोटी, उत्कटता दाखविण्यासाठी शूद्रकाने पूर्ण पाचवा अंक खर्ची घातला आहे. शूद्रकाने आपल्या नाटकातील पात्रानुसार उत्तम, मध्यम अशा प्रकारच्या कल्पना वापरलेल्या दिसतात. उदा.

विद्युज्जिह्वनेदं महेन्द्रचापोच्छ्रितायतभुजेन
जलधरविवृद्धहनुना विजृम्भितमिवान्तरिक्षेण ।।५१.५ मृ

वीजरुपी जीभ असलेल्या, इंद्रधनुष्यरुपी वर उचलून धारलेल्या भुजानी पाण्याने भरलेल्या मेघरुपी कपोल असलेल्या आकाशाने जणू जांभई दिली आहे. अशा प्रकारचे वर्णन चारुदत्ताच्या तोंडी आले आहे तर

एते हि विद्युद्गुणबद्धकक्षा गजा इवान्योन्यमभिद्रवन्तः
शक्राज्ञया वारिधराः सधारा गां रूप्यरज्ज्वेव समुद्धरन्ति
२१.५ मृ.

ज्यांच्या कमरेला वीजरूपी दोर बांधले आहेत असे एकमेकांना धक्के मारणारे हत्ती दिसावेत तसे हे मेघ इंद्राच्या आज्ञेने पृथ्वीला पाण्याच्या धारारूपी चंदेरी दोरानी वर खेचत आहेत.

अशा प्रकारची कल्पना विटाच्या तोंडी घातली आहे. शूद्रकाचे निसर्गविषयीचे प्रेम, त्याचे सुक्ष्म निरीक्षण आणि त्याची अफलातून वर्णन शैली रसिक मनाला मोहविल्याविना राहत नाही.

भास, कालिदास, भवभूती, शूद्रक यांच्या नाटकांतील निसर्गाचा एकत्रित स्वरूपात विचार केला असता निसर्गाच्या विविध रूपानी या सर्वांना मोहात पाडले आहे. भास, भवभूतीनी स्थितप्रज्ञ राहून निसर्गाचे वर्णन केले आहे. तर कालिदास शूद्रक निसर्गाच्या प्रेमात पडले आहेत असे त्यांच्या नाटकांतील निसर्गावरून दिसते.

अशा प्रकारे रसातील उद्दीपन विभावासाठी, अलंकारात उपमानरूपात, निसर्गाने फार मोठे योगदान दिले आहे. शिवाय निसर्गाचे मानवीकरण करण्याची संस्कृत कवींची हातोटी, निसर्गाचा सूचक म्हणून कवींनी केलेला वापर आणि संस्कृत साहित्यात रूढ झालेले आणि स्थिरता प्राप्त केलेले निसर्गघटकांचे संकेत, मानवी जीवनाला मार्गदर्शन करणारा, नाटकीय पात्रांच्या स्वभाव परिपोषणाचे काम करणारा हा निसर्ग म्हणजे जणू काही संस्कृत साहित्याकाशातील इंद्रधनुष्यच!

--- o ---

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## - संक्षेप सूची -

| | | |
|---|---|---|
| अ. शा | : | अभिज्ञान शाकुन्तलम् |
| वि. | : | विक्रमोर्वशीयम् |
| मा. | : | मालविकाग्निमित्रम् |
| स्व. | : | स्वप्नवासवदत्तम् |
| उ. | : | उत्तररामचरितम् |
| मृ. | : | मृच्छकटिकम् |
| ना. शा. | : | नाट्यशास्त्र |

## संदर्भ ग्रंथ सूची

=-=-=-=-=-=-


| | | |
|---|---|---|
| १] | अभिज्ञान शाकुन्तलम् - [कालिदास] | श्री. रा. शं वाळिंबे |
| २] | विक्रमोर्वशीयम् -[ कालिदास ] | श्री. रामाभिलाष त्रिपाठी |
| ३] | मालविकाग्निमित्रम् - [कालिदास ] | डॉ. गो. के. भट |
| ४] | स्वप्नवासवदत्तम - [भास ] | कै. एम. आर. काळे. |
| | मराठी संस्करण | वा. के. जोशी |
| ५] | उत्तरराम चरितम् - [भवभूती ] | प्रा. दि. मो. हातवळणे |
| | | प्रा. म. मो. केळकर |
| ६] | मृच्छकटिकम् - [शुद्रक ] | डॉ. रमाशंकर त्रिपाठी |
| ७] | रसविमर्श | डॉ. के. ना. वाटवे |
| ८] | नाट्यशास्त्र | भरतमुनी |
| ९] | कालिदासाची सृष्टी | मा. दा. आळतेकर |
| १०] | कालिदास दर्शन | डॉ. गो. के. भट |
| ११] | संस्कृत नाट्य सौंदर्य | डॉ. के. ना. वाटवे |
| १२] | गीर्वाण लघुकोश | जनार्दन विनायक ओक |
| १३] | संस्कृत वाङ्मयाचा इतिहास | श्री. सी. वा. पैंडसे |
| १४] | संस्कृत नाटककार | कान्ती किशोर भरतिया |
| १५] | अलंकार चंद्रिका | गणेश मोरेश्वर गोरे |
| १६] | काव्यप्रकाश [ मम्मट] | डॉ. सत्यव्रत सिंह |


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.